कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२, मुंबई - ४०० ००१.

मनुवराडे
६/१०/२०२०

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी
२२७९९३९६

---

प्रसिध्दी पत्रक क्र.४
दिनांक : ०६.१०.२०२०

## बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी श्री. प्रविण शिंदे यांची निवड

मुंबई, ०६ - वर्ष २०२०-२१ करिताच्या बेस्ट समितीच्या अध्यक्ष पदासाठी दिनांक ०६ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या निवडणुकीत शिवसेना पक्षाचे श्री. प्रविण शिंदे हे ८ विरुध्द ५ मतांनी विजयी झाले. यावेळी काँग्रेसचे २ सदस्य तटस्थ राहिले, २ सदस्यांची मते अवैध ठरली.

श्री. शिंदे हे प्रभाग क्र.७३ (जोगेश्वरी) चे नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. गेल्या २ वर्षापासून त्यांनी बेस्ट समितीचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. त्यांची बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी प्रथमच निवड झाली आहे.

मुंबईच्या महापौर मा.श्रीमती किशोरी पेडणेकर यांनी बेस्ट समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले.

श्री. शिंदे यांची बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मुंबईचे महापौर मा.श्रीमती किशोरी पेडणेकर, स्थायी समितीचे अध्यक्ष व बेस्ट समितीचे पदसिध्द सदस्य श्री. यशवंत जाधव, सर्व बेस्ट समिती सदस्य तसेच बेस्टचे महाव्यवस्थापक डॉ. सुरेंद्रकुमार बागडे यांनी श्री. शिंदे यांचे अभिनंदन केले.

=====

# अध्यक्ष बेस्ट समिती श्री. प्रविण शिंदे यांचे मंगळवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२० रोजीचे भाषण

सर्वप्रथम महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज, महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वंदनीय शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या पवित्र स्मृतीस मी अभिवादन करतो.

सन्माननीय मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांचे आशीर्वाद आणि सन्माननीय पर्यावरण मंत्री, युवासेना प्रमुख, शिवसेना नेते श्री. आदित्यजी ठाकरे यांचे मार्गदर्शन यामुळे,तसेच माननीय महापौर श्रीमती. किशोरीताई पेडणेकर, माननीय उपमहापौर श्री. सुहासजी वाडकर, माननीय सभागृह नेत्या श्रीमती. विशाखा राऊत, माननीय खासदार व शिवसेना नेते श्री. गजानन कीर्तिकर, माननीय परिवहन मंत्री व विभागप्रमुख श्री. अनिल परब, शिवसेना पक्ष प्रतोद व विभागप्रमुख श्री. सुनील प्रभू आणि माननीय आमदार श्री. रवींद्र वायकर या सर्व मान्यवरांच्या प्रेरणेने २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरिता बेस्ट समितीच्या अध्यक्षपदी माझी नेमणूक झाली त्याबद्दल मी या सर्वांचा शतशः ऋणी आहे. माननीय स्थायी समिती अध्यक्ष श्री. यशवंत जाधव आणि मावळते अध्यक्ष श्री. अनिल पाटणकर, तसेच माननीय बेस्ट समिती सदस्य यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.

सन्माननीय मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे यांनी मागील अनेक दशकांपासून मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग असलेल्या "बृहन्मुंबई विद्‌युत पुरवठा आणि परिवहन समिती" च्या अध्यक्षपदी माझी नेमणूक करून प्रवासी जनता व वीजग्राहक यांच्या समस्यांचे निवारण करण्याची तसेच प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या दरम्यान समन्वय साधण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. मी याठिकाणी आपणांस आश्वस्त करू इच्छितो की, त्यांनी माझ्यावर दाखिवलेल्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. त्यादृष्टीने, बेस्ट उपक्रमातर्फे उपलब्ध करण्यात येणाऱ्या विद्‌युत पुरवठा व परिवहन या दोन्ही सेवा अधिकाधिक कार्यक्षम व लोकाभिमुख करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे.

बेस्ट उपक्रमाच्या अध्यक्षपदी कार्यरत असताना, माझ्या विविध योजनांना मूर्त स्वरूप देण्याच्या कामी बेस्ट समितीचे सन्माननीय सदस्य, बेस्ट उपक्रमाचे माननीय महाव्यवस्थापक डॉ. सुरेंद्रकुमार बागडे, अधिकारी व कर्मचारी वर्ग, विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी या सर्वांचे पाठबळ मला निश्चितच लाभेल असा विश्वास मी या ठिकाणी व्यक्त करू इच्छितो. कोरोनाच्या संकटकाळामध्येही बेस्ट उपक्रमाचा लौकिक अबाधित रहावा यासाठी एकजूट होऊन प्रयत्न करण्याचे आवाहन मी आपणा सर्वांना करीत आहे.

या कोरोना महामारीच्या काळात संपूर्ण जनजीवन ठप्प असताना कोरोना बाधित रुग्णांची सेवा करण्यासाठी तत्पर असलेल्या कोरोना योध्यांना त्यांच्या इच्छित स्थळी ने-आण करण्याकरिता आणि अत्यावश्यक सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांची गैरसोय होऊ नये म्हणून कोरोना महामारीच्या प्रकोपात आपल्या जीवाची बाजी लावून सेवेत तत्पर असलेल्या बेस्ट उपक्रमाच्या सर्वच अधिकारी व कर्मचारी वर्गाबाबत कृतज्ञता व्यक्त करताना अभिमानही वाटतोय आणि आनंदही होतोय.

त्याचप्रमाणे या महामारीच्या काळात जनसेवेचे व्रत घेऊन काम करीत असताना कोरोना बाधीत होऊन प्राणांची आहुती दिलेल्या बेस्ट उपक्रमाच्या बहाद्दर अधिकारी व कर्मचारी यांना आदरांजली वाहतो. त्यांची हि कर्तव्य तत्परता इतर अधिकारी व कर्मचारी वर्गास निश्चितच प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

!! जय हिंद !! जय महाराष्ट्र !!